ISSN–2277- 8721

EIIRJ

Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– I

Nov – Dec 2022

OPEN ACCESS

Original Research Article

# धर्मनिरपेक्ष बहुसांस्कृतिकता अन्वयार्थ व आशयसह

* डॉ. अमन बगाडे ,

* विभाग प्रमुख, तत्त्वज्ञान विभाग, न्यू. आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर

**सारांश :**

*'सॅक्यूलॅरिझम' या इंग्रजी शब्दाला मराठी पर्यायी शब्द म्हणून 'धर्मनिरपेक्षता' हा शब्द वापरला जातो मात्र तो शब्द तितकासा चपखल नाही आहे, कारण कोणत्याही एका विशिष्ट शब्दाला त्या त्या विशिष्ट परिनिवेषात विशिष्ट ऐतिहासिक, सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ व अन्वय असतो, तसा तो मराठीतील धर्मनिरपेक्षता या शब्दाला नाही. असे असले तरी सेक्यूलॅरिझम या शब्दाला मराठीत दुसरा पर्यायी नेमका शब्द नसले कारणाने तसेच येथील सर्वच विचारवंतांनी त्याचा वापर केला असल्यामुळे या लेखात आपण त्याच शब्दाचा वापर करणार आहोत.*

**Copyright © 2022 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

**पाश्चात्य 'सेक्यूलॅरिझम' संकल्पनेच्या निर्मितीचा ऐतिहासिक अन्वयार्थ:**

युरोपमध्ये धर्मसत्ता आणि राज्यसत्ता यांच्या संघर्षाचा परिणाम म्हणून 'सेक्यूलॅरिझम' ही संकल्पना पुढे आल्याचे दिसते. युरोपमध्ये कायमच धर्मसत्ता आणि राजसत्तेत कडवा संघर्ष झडत राहिला होता. ख्रिश्चन धर्माने 'आध्यात्मिक' (Spiritual) आणि 'भौतिक' (Material) या दोहोतील 'व्दैत' लक्षात घेऊन धर्मसत्तेच्या व राज्यसत्तेच्या अधिष्ठानांना मान्यता दिली; त्यांच्यात कोणत्याही प्रकारचा आंतर्भाव निर्माण होऊ नये म्हणून त्यांनी एक अधिनियम तयार करून घेतला होता तो म्हणजे ''सीझरचे देणे सीझला द्या आणि देवाचे देणे देवाला वाहा''.[१] ( Render unto Caesar the things that are Caesar's; and unto God's the things that are God's )

असे असले तरी धर्मसत्ता आणि राज्यसत्तेतील पारंपरिक संघर्ष काही केल्या क्षमला नाही. अगदी चौथ्या शतकापासून त्यांच्यातील संघर्षाला तोंड फुटले होते. तेराव्या शतकात तर त्याला उग्र स्वरुप प्राप्त झाले. चौदाव्या शतकात इटलीमध्ये मार्सिग्लियो (Marsiglio) या विचारवंताने ''सेक्यूलॅरिझम' आणि 'सेक्यूलर स्टेट' ची संकल्पना सुस्पष्ट केली. ''सेक्यूयलर' हा शब्द त्याने 'डिव्हाइन लॉ (Divine Law) आणि ह्यूमन लॉ (Human Law) अर्थात 'दैवी कायदा' आणि 'मानवी कायदा' यांच्यातील भेद रेषा स्पष्ट करण्यासाठी वापरला असल्याचे दिसते. ''नागरिकांचे 'इहलौकिक' (सेक्यूलर) जीवन हे मानवी कायद्याच्या आधारावरच नियंत्रित केले पाहिजे, आणि तो अधिकार राजसत्तेचा आहे; तो धर्मसत्तेचा नाही''[२] असा सिध्दांत मार्सिग्लियोने मांडला. धर्माचा संबंध व्यक्तीच्या 'पारलौकिक' (स्पिरिच्यूअल) जीवनाशी येतो; आणि म्हणून त्याचे नियंत्रण किंवा नियमण 'देवी कायद्याच्या (डिव्हाइन लॉ ) आधारावर केले पाहिजे, आणि तो अधिकार धर्मसत्तेचा आहे ही गोष्टही याच विचारवंताने स्पष्ट केली. अशा प्रकारे ग्रीकांनी

राज्य आणि धर्म (चर्च) यांचे अधिकारक्षेत्र ठरवून दिले होते. वस्तूत: हा एक क्रांतीकारक विचार होता; आणि तो पुढे युरोपमध्ये प्रबळ होत गेला. ‘चर्च’ आणि ‘राज्य’ यांच्यातील निर्णायक संघर्षात ‘राज्य’ हे अधिक प्रबळ ठरले. तथापि तेराव्या शतकात प्रारंभ झालेला हा संघर्ष अठराव्या शतकाच्या पूर्वाधात सातत्याने चालूच होता. या प्रदिर्घ धुमश्चक्रीमध्ये ‘धर्मकारण’ आणि ‘राजकारण’ यांच्यातील वाद शिगेला पोहचला. संबंध युरोप खंड त्यामुळे ढवळून निघाला. तरी पण धर्माचा लोकजीवनावरचा प्रभाव क्षीण होणे शक्य नव्हते. व्यक्तीचे ‘आध्यात्मिक’ जीवन समृध्द करावयाचे असेल आणि शेवटी मुक्ती मिळवायची असेल तर धर्माचा व धर्मशास्त्राचा आधार घेणे अटळ होते. पण त्याचबरोबर ‘भौतिक’ (सेक्यूलर) जीवन सुखी आणि समृध्द होणे सुध्दा आवश्यक आहे, आणि त्या समृध्दीसाठी धार्मिक बंधने कमी केली पाहिजेत असे ठरविण्यात आले पण ‘चर्च’ला हे मान्य नव्हते. शास्त्र वचनाच्या पलिकडे जाऊन चर्चला विचार करता येणे शक्यही नव्हते. ‘इहवादी’ जीवनाच्या सुख-समृध्दीसाठी पुढे धर्मसत्तेकडून राज्यसत्तेला पाठींबा देणे अपरिहार्य ठरले आणि धर्मनिरपेक्षतेचा बहर सुरु झाला.

**आणि मध्ययुगीन मानसिकतेचे बंध गळाले:**

युरोपातील सर्वच आध्यात्मवादी तत्त्वज्ञांनी मानवी जीवनाचे अंतिम फलित ‘मुक्ती’ हेच मानले आहे. त्यांचे मते मानवाला मुक्ती मिळवायची असेल तर त्यांचे पापापासून ‘विमोचन’ (Imancipation) झाले पाहिजे. मुक्तीची संकल्पना ही मुलत: ‘धार्मिक’ अर्थात ‘आध्यात्मिक’ आहे. त्या संकल्पनेला ‘भौतिक’ (सेक्यूलर) परिमाण मिळणे देखील तितकेच आवश्यक होते. धर्मसत्ता आणि राज्यसत्ता यांच्या संघर्षातून तो वैचारिक खल सर्व युरोपमध्ये झाला त्याच्यातून तिला निश्चित परिमाण मिळाले. आणि हे परिमाण म्हणजेच भौतिक जीवनातले ‘स्वातंत्र्य‘ होय. या परिमाणातून स्वातंत्र्याची (Liberty) संकल्पना विकसित होत गेली. ‘आध्यात्मिक मुक्ती’ आणि ‘भौतिक स्वातंत्र्य’ या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत हे मानण्यात आले. भौतिक जीवन सुखी व समृध्द करण्याच्या धडपडीतून युरोपच्या हातात ‘विज्ञान’ आले. विज्ञानाची प्रगती जसजशी होत गेली तसतशी बायबल आणि त्यावर आधारीत धर्मशास्त्रीय आचार-विचार (Theology) यांच्यातील दरी आणि विसंगती अधिकाधिक स्पष्ट होऊ लागली. खरे तर लोकांच्या धर्मश्रध्देलाच विज्ञानाने फार मोठा धक्का दिला. एकीकडे चर्च आणि राज्य यांच्या संघर्षात चर्चचे अधिकार क्षेत्र सीमित होत गेले, तर दुसरीकडे ज्या धर्मश्रध्देच्या पायावर चर्च उभे होते त्या धर्मश्रध्देलाच जबरदस्त हादरे बसत गेले. इतकेच नव्हे तर काही प्रमाणात आस्तित्ववादालाच हादरा बसला. अशा अवस्थेत जडवादी तत्त्वज्ञानाला अर्थात भौतिकवादी विचारसरणीला प्रोत्साहन मिळाले. ‘रिफॉर्मेशन’, ‘रिनेसॉन्स’ आणि ‘एन्लायन्टमेन्ट’या नावाने ओळखल्या जाणा-या वैचारिक चळवळींनी संपूर्ण युरोप ढवळून निघाला. आणि अशा प्रकारे मध्ययुगीन मानसिकतेचे बंध तुटुन युरोपने ‘आधुनिक’ जगात पदार्पण केले. धर्मसत्ता आणि राज्यसत्ता यांच्या संघर्षातून सेक्यूलॅरिझमने पदार्पण केले. धर्मसत्ता आणि राज्यसत्ता यांच्या संघर्षातून निर्माण झालेल्या सेक्यूलॅरिझमच्या संकल्पनेला तेराव्या शतकापासून ते अठराव्या शतकापर्यंत चाललेल्या प्रबोधनाच्या सर्वंकष चळवळीतून जावे लागले आहे. तिचा अन्वयार्थ व आशय समजून घेण्यासाठी इहवाद, जडवाद, निरिश्वरवाद, आधुनिकवाद इत्यादी संकल्पना सुध्दा समजून घेणे आवश्यक ठरते. मात्र

ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– I Nov – Dec 2022

OPEN ACCESS Original Research Article

तो इथे आपल्या संशोधन पेपरचा विषय नसलेने त्याबाबत अलाहिजा. एकूणच सेक्युलॅरिझम या शब्दाचा अर्थ धर्मविरोध,अधर्म असा होत नाही. सेक्यूलर म्हणजे ॲंटिरिलिजिअस, (Anti-religious) अ-रिलिजिअस (A-Religious) किंवा नॉन-रिलिजिअस (Non-Religious) असेही मानता येणार नाही. या संकल्पनेत ऐहिक जीवनाच्या धारणेसाठी आवश्यक असणा-या नैतिकमूल्यांचा समावेश मात्र निश्चितच होत आहे. यावरून " ऐहिक जीवनाच्या धारणेसाठी आवश्यक असणा-या नैतिकमूल्यांवर आधारित समाजा जीवनप्रणाली म्हणजे सेक्यूलॅरिझम होय."[३] असा पाश्चात्य संस्कृतिच्या पातळीवर धर्मनिरपेक्षता संकल्पनेचा सारांश स्वरुपात अर्थ निश्चिती ठरते.

**बहुसांस्कृतिक धर्मनिरपेक्षता संकल्पनेची भारतीय ऐतिहासिक पार्श्वभूमी व समाज वास्तव:**

सेक्यूलॅरिझमचा स्वीकार भारताने गेल्या अनेक वर्षापासून केला आहे. इथे ही संकल्पना आपण 'धर्मनिरपेक्षता' किंवा 'धर्मातीतता' या समान अर्थाने वापरत आहोत, असे असले तरी या 'धर्मनिरपेक्ष 'या शब्दाला 'सेक्यूलर' या शब्दामागचे सर्व संदर्भ प्राप्त होत नाहीत.

आपल्या देशात धर्मसत्ता व राजसत्ता यांच्यात युरोपप्रमाणे संघर्ष झालेला नाही. 'धर्मक्षेत्र' व कुरूक्षेत्र' एकरूप राहीले आहेत. याचा अर्थ येथे धर्माचे प्राबल्य नव्हते असा होत नाही. उलट येथील राजसत्ता ही धर्मसत्तेच्या अंकीत होती असे म्हणावे लागेल. धर्मसत्तेची सुत्रे ज्यांच्या हातात होती त्यांच्या हातात राजदंड मात्र नव्हता आणि म्हणून 'धर्मपीठ विरूध्द राज्य' अशी अवस्था येथे निर्माण झाली नाही. येथील वर्णव्यवस्था ही श्रमविभागणीच होती; खरेतर ती एका अर्थाने समाज विभागणीच होती.''[४] कार्यविभागणीच्या सिध्दांतावर आधारलेल्या समाजात एका वर्णाच्या हातात धर्मसत्ता होती तर दुस-याच्या हातात राजसत्ता होती. या दोन वर्णात संघर्षाचे प्रसंग निर्माण झाले नाहीत असे नाही. ते झाले; पण राजसत्तेच्या विरूध्द वैचारिक भूमिका घेऊन बंड झाले असे येथे कधीही घडले नाही. राजसत्तेने भौतिकवादी किंवा इहवादी भूमिका घेऊन धर्मसत्तेच्या आध्यात्मवादी तत्त्वज्ञानाच्या विरुध्द संघर्ष केल्याची उदाहरणे भारताच्या इतिहासात क्वचितच सापडतील. धर्मश्रध्देने भारताला स्थितीशील बनवून टाकले. विविध संप्रदाय येथे निर्माण झाले; पण अंतत: स्थितीशीलतेच्या चिखलातच रुतून बसले. नाही म्हणायला बुध्द धर्माचा याला अपवाद आहे. या धर्माने मात्र समाजाला 'इहवादी' दृष्टी दिली. लोकायत संप्रदायानेही येथे इहवादी दृष्टीकोण रुजविण्याचा प्रयत्न केला, पण त्यांच्या पदरात फारसे यश पडले नाही.

आपल्या देशात 'धर्मपीठ विरूध्द राजसत्ता' असा संघर्ष उद्भवला नाही याचे प्रमुख कारण म्हणजे हा देश सुरुवातीपासूनच बहुधर्मीय राहिलेला आहे. राजा ज्या धर्माचा असेल त्या धर्माला राज्यसत्तेचा पाठिंबा मिळणे स्वाभाविक होते. त्या धर्माला मानणा-या समाजाचे महत्त्व थोड्या बहुत प्रमाणात वाढणे हे ही स्वाभाविक होते. पण असे असले तरी प्रत्येक धर्मसंप्रदायाकडे समभावाच्या व आदराच्या दृष्टीने पाहिले पाहीजे. अशा प्रकारची शिकवण भारतीय जनमाणसात साधू-संतांकडूनही चांगल्या प्रकारे रुजविण्यात आली होती हे निश्चित. ज्याच्या हातात राजदंड होता त्यांनी ही शिकवण लक्षात ठेवून राज्यकारभार केला. सम्राट अशोकाचे शीलालेख या गोष्टीची

ISSN–2277- 8721

EIIRJ

Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– I

Nov – Dec 2022

OPEN ACCESS

Original Research Article

साक्ष देतात.

इस्लामच्या आगमनानंतर मात्र या देशात जातीय संघर्षाला सुरुवात झाली. हिंदू-मुस्लिमांच्या संबंधांना सौहार्दाचे स्वरुप प्राप्त होऊ शकले नाही. सर्व समावेशकता, सहिष्णूता आणि सर्वधर्मसमभाव या मुल्यांना इस्लामध्ये स्थान मिळू शकले नाही. ''जो ईश्वराला मानीत नाही तो 'काफिर असा 'काफिर' या शब्दाचा मूळ अर्थ इस्लाममध्ये या शब्दाला पुढे प्राप्त झाला. ''[४] एकूणच एक-दोन अपवाद सोडले तर मुस्लिम राज्यकर्त्यांनी आणि त्याच बरोबर मुस्लिम समाजाने समधर्मसमभावाचा अवलंब केला नाही.

पाश्चिमात्यांचा शिरकाव या देशात झाल्यानंतर ख्रिश्नन धर्मप्रसाराला वाव मिळाला. ब्रिटिश राजवटीने अप्रत्यक्षपणे ख्रिश्चन धर्माच्या प्रचार-प्रसाराला प्रोत्साहन दिले. ब्रिटिशांनी आपली सत्ता बळकट करण्यासाठी येथील विविध धर्माच्या लोकांमध्ये फुट पाडण्याचाच प्रयत्न केला. देशाचे विभाजन हे त्या कुटनीतीचेच कटू फळ आहे  असे म्हणणे भाग आहे. धर्माचा वापर राजकीय शस्त्र म्हणून करण्यात आला ही गोष्ट उघड आहे. भारतासारख्या विविध धर्मीय लोकांच्या देशात सर्वधर्मसमभावाची नितांत गरज आहे  असे  आपल्या राष्ट्रीय नेत्यांनी नेहमीच सांगितल्याचे दिसून येते. सहअस्तित्वासाठी ते आवश्यक आहे. याच कारणास्तव  धर्मनिरपेक्षता म्हणजे सर्वधर्मसमभाव या  विचारालाच येथे अधिक मान्यता प्राप्त झाल्याचे दिसून येते. मात्र येथे 'धर्मनिरपेक्षता म्हणजे इहवाद होय'  हा युरोपियनांचा विचार तितका खोलवर रुजला नाही, ही गोष्ट मात्र मान्य केली पाहिजे.

भारतात इहवादी (सेक्यूलर) जीवदृष्टीचा प्रसार झाला तो ब्रिटिश आमदानीच्या काळात हे मात्र मान्य करावे लागेल. या  देशात शतकानुशतके शिक्षणाचा अभाव असल्यामुळे लोकांमध्ये  धर्म विषयक अंधश्रध्दा वाढत गेल्या. पण ब्रिटिश राजवटीबरोबर या देशात आधुनिक ज्ञान आणि  विज्ञानाचेही आगमन झाले. परिणामत: प्रबोधनाची प्रक्रिया येथेही आरंभ झाली. राजाराम मोहनरॉय यांच्या सतिप्रथा बंदी चळवळीपासून येथे भारतीय प्रबोधनाची प्रक्रिया बळकट होत गेली. भारतीय प्रबोधनाने येथे तेव्हापासूनच एकीकडे सर्वधर्मसमभावाची परंपरा दृढ केली तर दुसरीकडे इहवादी जीवनदृष्टीचा पुरस्कारही केला. आणि म्हणून आपण धर्मनिरपेक्षतेची जी संकल्पना स्वीकारली आहे.  तिच्यात सर्वधर्मसमभाव आणि  इहवाद या दोन्हीही मुल्यांचा आंतर्भाव होत असल्याचे जाणवते.

**बहुसांस्कृतिक धर्मनिरपेक्षतेसाठी राज्याधिकृत धर्माची  अनिष्ठता:**

आपल्या घटनाकारांनी 'सर्वधर्मसमभाव' आणि 'इहवाद' या दोन्हीही मूल्यांचा खोलात जाऊन विचार केकेला दिसतो. भारत हे धर्माधिष्ठित राज्य  (Theocratic state) असणार नाही ही गोष्ट संविधानात  उघड आहे. हिंदू धर्म हा या देशातील बहुसंख्यांकांचा धर्म असला तरी  त्याला राज्याधिकृत धर्म (State-Religion) म्हणून घटनेने मान्यता दिलेली नाही. कारण धर्मधिष्ठित राज्य हे ख-या अर्थाने 'सेक्यूलर' असू शकत नाही असाच घटनाकारांचा त्यापाठीमागील विचार असावा. राज्याधिकृत धर्माचे खालील चार अनिष्ठ परिणाम  स्पष्टपणे जाणवतात:

१) एखाद्या राष्ट्राने ज्या धर्माला राज्याधिकृत धर्म म्हणून मान्यता दिलेली असते त्या धर्माचे लोक हे प्रथम श्रेणीचे नागरिक मानले जातात. अशा  राष्ट्रात धार्मिक अल्पसंख्यांकांना दुजाभावाची व पर्यायाने असमानतेची वागणूक दिली जाते.

ISSN–2277- 8721
EIIRJ
Electronic International Interdisciplinary Research Journal
Volume–XI, Special Issue– I
Nov – Dec 2022
OPEN ACCESS
Original Research Article

२) ज्या धर्माला राज्याधिकृत धर्म म्हणून मान्यता दिलेली असते तो धर्मच त्या राष्टातील कायद्याच्या प्रमुख आधार असतो. धर्मशास्त्र हेच राज्य घटनेचे अधिष्ठान असल्यामुळे त्या देशातील न्यायव्यवस्था धर्माच्या चौकटीबाहेर जाऊ शकत नाही.

३) धर्माधिष्ठित राष्ट्रात ख-या अर्थाने लोकशाही नांदू शकत नाही. कारण समतेच्या तत्त्वावर सर्व नागरिकांना सारखीच वागणूक तेथे मिळू शकत नाही. 'समान अधिकार' आणि 'समान संधी' या दोन तत्त्वांवर लोकशाही आधारलेली असते. धर्माच्या आधारावर नागरिकांमध्ये भेद करणे याचा अर्थ काही नागरिकांना अधिक अधिकार व काहींना कमी संधी असाच होतो. अधिकाराची व संधीची समानता ही ख-या अर्थाने स्वातंत्र्याची समानता असते. स्वातंत्र्याची समानता हाच ख-या अर्थाने धर्मनिरपेक्ष लोकशाही समाजव्यवस्थेचा पाया असतो. धर्माधिष्ठित राष्ट्रात 'न्याय समाज' (Just Society) अस्तित्वात येऊ शकत नाही.

४) धर्माधिष्ठित राष्ट्रातले शासन कालबाह्य कायद्यावर व मूल्यांवर आधारलेले असते. त्या राष्ट्रातली समाज व्यवस्थाही कालबाह्य मूल्यांवर आधारलेले असते. धर्मशात्राला कालसापेक्षिता व मूल्य सापेक्षिता मान्य असते आणि म्हणूनच धर्माधिष्ठित समाज परिवर्तशील नसतो तर इहवादी म्हणजेच बहुसांस्कृतिक धर्मनिरपेक्ष समाजच परिवर्तनशील असतो असा निष्कर्ष येथे व्यंजित होतो.

**बहुसांस्कृतिक धर्मनिरपेक्ष राज्यासाठी घटनाकारांचे नियोजन:**

"आमच्या घटनाकारांनी बहुसांस्कृतिक धर्मनिरपेक्षतेला बाधक ठरणा-या सर्व परिणामांचा विचार केलेला असल्यामुळेच त्यांनी भारताला धर्मनिरपेक्ष राष्ट्र बनविण्याचा संकल्प पूर्णत्वास नेला असावा."[५] बहुसांस्कृतिक धर्मनिरपेक्ष राज्यात विविध धर्माच्या लोकांना धार्मिक स्वातंत्र्यही दिले पाहिजे हे खरे असले तरी त्याचबरोबर राज्यकारभारामध्ये धर्मसंप्रदायाचा हस्तक्षेप होता कामा नये, अशा प्रकारची खबरदारी व भूमिकाही त्यांनी घेतली घेतली असल्याचे दिसते. वस्तुत: त्यांची ही भूमिका रास्त व योग्य होती. विविध धर्माच्या लोकांना आपल्या धर्मश्रध्दा उरी बाळगण्याचा अधिकार भारतीय राज्यघटनेने दिलेला आहे. पण त्याचबरोबर या देशातील राज्यकारभार कोणत्याही धर्मशास्राच्या आदेशानुसार चालणार नाही आणि या देशातील कायदे कोणत्याही धर्माचे अधिष्ठान मानून बनविले जाणार नाहीत, या गोष्टीची काळजीही घटनाकांरांनी घेतली आहे. '' भारतीय राज्यघटनेची अतिशय महत्त्वपूर्ण तरतूद म्हणजे राज्यघटनेने विविध धर्मियांच्या धर्मश्रध्दांना आणि व्यक्तिगत कायद्यांना (Personal Law) मान्यता दिली असली तरी आज ना उद्या 'समान नागरी कायदा' बनविण्याचा मानसही तिने असंदिग्ध स्वरुपात व्यक्त केला आहे.''[६] परिणामत: धर्म आणि राज्य यांचा अन्योन्य असा कसलाही संबंध नाही असाच अर्थ भारतीय राज्यघटनेने अधोरेखित करुन सर्व धर्म, वंश, जात, भाषा, प्रांत व वर्गीयांच्या बहुसंस्कृत्यांना या देशाच्या भूमीत गुण्या गोविंदाने जीवन मापन करण्याचा हक्क व अधिकार दिला असल्याचे दिसते.

**सारांश :**

भारतात वांशिक,धार्मिक व सांस्कृतिक व्यामिश्रता प्रचंड प्रमाणात आढळते. येथे गेल्या अनेक वर्षापासून अनेक धर्मसंप्रदाय नांदत आलेले आहेत. त्यानिमिताने येथे विविध तत्त्वज्ञानांची निर्मिती झाली. विविध भाषांतील साहित्याचा आणि विविध कलांचा विकास

त्या त्या तत्त्वज्ञानावर आधारित येथे झाला. परिणामत: त्यातून एका संमिश्र संस्कृतीची (Composite culture) येथे निर्मिती झाली. खरे तर ही संमिश्र संस्कृती आपल्याला बहुसांस्कृतिकतेचा मार्ग प्रशस्त करुन देण्यास उपयुक्त ठरुन तोच आपल्याला अभिप्रेत असलेल्या धर्मनिरपेक्ष राष्ट्रीयत्वाचा मुलाधार बनू शकला. ज्या अनेक घटकांचा समावेश संस्कृतीच्या निर्मिती व विकासामध्ये झालेला असतो त्यात धर्म हा एक महत्वाचा घटक असतो , नाही असे नाही. पण धर्म म्हणजे संस्कृती नव्हे हे ही आपण लक्षात घेतले पाहिजे. संस्कृती ही धर्मापेक्षा अधिक व्यापक असते. ती प्रामुख्याने बहुसांस्कृतीक स्वरुपाची असेल तर ती सर्वांना एकात्मतेचा वारसा देऊन स्वातंत्र्य, समता व बंधुभावाच्या मानवी मूल्यांचा पुरस्कार करणा-या मानवाच्या समूहास म्हणजेच लोकशाही मूल्यांना प्रोत्साहीत करणारी ठरते.

‘’ विविध धर्मियांच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवन व्यवहारातून भारतात संमिश्र संस्कृतीची निर्मिती झाली असली तरी, आणि सर्वधर्मसमभावाचा आग्रह येथील समाजसुधारकांनी, संतांनी व राष्ट्रनेत्यांनी धरला असला तरी, हिंदू समाजातील जातिभेदामुळे सर्व समाज घटकांतील . लोकांना समान सामाजिक स्वातंत्र्य व प्रतिष्ठा येथे मिळू शकली नाही.’’ [७]

वरील संदर्भाला अनुसरुन असे मान्य करावे लागते की, इतर धर्माचा व धर्मियांचा आदर करणे ही गोष्ट केव्हाही स्वागतार्ह मानली पाहिजे. पण आपण आपल्याच धर्मातील लोकांना असमानतेची वागणूक देतो ही गोष्ट तितकीच निषेधार्ह आहे. बहुसांस्कृतिक सर्वधर्मसमभावाचे तत्त्व हे खरे तर बंधुभावाचे तत्त्व आहे, पण या बंधुभावाला स्वातंत्र्य आणि समतेच्या संदर्भातच अर्थगर्भता प्राप्त होऊ शकते, हे ही तितकेच खरे आहे. अंतिमत: ‘बहुसांस्कृतिक धर्मनिरपेक्षता म्हणजे खरे तर भेदातील न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव होय !’

**संदर्भ:**


- A short History of western civilization, John B. Harrison and Richard E. Sulivan.
- The concise oxford Dictionary : 4th edition, revised by E. Mc. Jntosh, at clarendan press oxford, 1952.
- Secularism and constitution on India : P. G. Gajendragadkar, University of Bombey, 1971.
- Identity Crisis of muslim : Shiniunsan Nirmala
- भारताचे शासन आणि राजकारण भोळे भास्कर,देशपांडे ना ,इ.
- Thus spoke Ambedkar (selected speachers, voll II ) Ed. Bhawandas, Bheema patrika publication,
- Jullunder,1969.


**Cite This Article:**
*प्रा. डॉ. अमन बगाडे, (2022)* धर्मनिरपेक्ष बहुसांस्कृतिकता अन्वयार्थ व आशयसह, ***Electronic International Interdisciplinary Research Journal,*** *Volume No XI (Special Issue-I), 15-20.*